| 2024 | II | 23 |
|---|---|---|

1100

**J-809**

(M)

# MARATHI (02)

Time : 3 Hrs. (11 Pages) Max. Marks : 80

## कृतिपत्रिका

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

*(१) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलीने व्यवस्थित काढाव्यात.*

*(२) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.*

## विभाग १ - गद्य [२०]

**कृती १. (अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** (८)

(१) चौकटी पूर्ण करा - (२)

(य) विचारांची गती म्हणजे - [ ]

(र) दिशाविहीन गती म्हणजे - [ ]

(२) कारणे लिहा - (२)

माणूस घरातून दारात आला, की वाहनावर आरूढ होतो, कारण ----

(य) ...............

(र) ...............

| 0 | 8 | 0 | 9 |
|---|---|---|---|



https://www.maharashtrastudy.com

वेग हे गतीचे एक रूप आहे. आपले जीवनही स्थिती आणि गती यांत विभागलेले आहे. थांबणे, चालणे, धावणे असे हे जीवनचक्र फिरतच असते. आपल्या विचारांनाही गती असते, जिला आपण प्रगती म्हणतो. ती विचारांची गती असते. गतीला जेव्हा दिशा असते तेव्हाच ती प्रगती या संज्ञेला पात्र ठरते. दिशाविहीन गती ही अधोगती ठरते. आजच्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते. रस्ते वाहनांनी व्यापलेले असतात. माणसे घरांत राहतात म्हणूनच अल्पकाळ तरी स्थिर राहतात. एरवी गतीपायी अगतिक होतात.

अहोरात्र भरारणारी आणि थरारणारी वाहने पाहिली म्हणजे आश्चर्य वाटते. ही आली कोठून? आली कशी आणि कशासाठी? पूर्वी देशोदेशींचा इतिहास घडला. लोकांनी जगप्रवासही केला; पण आजच्या एवढी अवखळ वाहने कोठे दिसत नसत. आता माणूस घरातून दारात आला, की वाहनावर आरूढ होतो. वेळ थोडा असतो. कामे बरीच असतात. पायी चालत ती उरकता येत नाहीत. जीवन हे दशदिशांना विभागलेले आहे. मुलांची शाळा एका टोकाला, आपले कार्यालय दुसऱ्या टोकाला, मंडई एका बाजूला तर दवाखाना दूर, कुठल्या तरी दिशेला. जीवनाची ही टोके साधणार कशी? जोडणार कशी? शेवटी गती ही घ्यावीच लागते. यथाप्रमाण गती ही गरज आहे; पण अप्रमाण, अवास्तव आणि अनावश्यक गती ही एक विकृती आहे. आपली कामे यथासांग पार पाडावीत, एवढा वेग जीवनाला असावा. त्यापेक्षा अधिक वेग म्हणजे अक्षम्य आवेग म्हणावा लागेल. तो आत्मघातकी ठरतो.

(३) स्वमत अभिव्यक्ती – (४)

'यथा प्रमाण गती ही गरज आहे'– हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**किंवा**

वाहन चालवत असताना कोणती काळजी घ्यावी, ते सविस्तर लिहा.

(आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : (८)

(१) जेव्हा दात दुखतो तेव्हा लेखकाला होणारे साक्षात्कार – (२)(४)

(य) ........................

(र) ........................



https://www.maharashtrastudy.com

(२) दुखऱ्या दाताबद्दलची लेखकाची मते : (२)

(य) ........................

(र) ........................

दात दुखायला लागला, की तो मुळापासून दुखू लागतो. किंबहुना दाताला मूळ असते हे फक्त तो दुखायला लागला म्हणजेच कळते. माझा दात जेव्हा दुखायला लागला तेव्हा तर माझी खात्रीच झाली, की आपण आरोग्यशास्त्राच्या पुस्तकात पाहिलेले दाताचे चित्र आणि प्रत्यक्ष आपले दात यांत फार फरक असला पाहिजे. आपल्या दाताला मूळ नसून झाडासारख्या मुळ्या असल्या पाहिजेत आणि त्या हिरड्यांत सर्वत्र पसरल्या असल्या पाहिजेत. नाहीतर सगळेच दात दुखत असल्याचा भास मला का व्हावा? प्रत्येक दाताला हात लावून पाहिल्यानंतर ज्या दाताने शंख करायला लावला, तो दुखरा दात याची खात्री झाली. दुखऱ्या दाताला लहानसा स्पर्शसुद्धा खपत नाही! बरे, हे दुखणे तरी साधे, सरळ असावे? तेही नाही. एखादया कवीच्या मनातील जिप्सीसारखा एखादा लाकूडतोड्या माझ्या दाताच्या मुळाशी खोल बसलेला असतो आणि तो एकामागून एक घाव घालीत असतो. असे म्हणतात, की दिवसा सभ्य दिसणारी माणसे रात्री आपल्या खऱ्या रूपात फिरतात. दात हा अवयवही अशाच माणसांसारखा असावा. नाहीतरी दिवसा अधूनमधून पण सभ्यपणे दुखणारा दात रात्री राक्षसासारखा अक्राळविक्राळ का होतो? दातांत आणि चोरांत साम्य असते ते याच बाबतीत. दोघेही रात्री गडबड करतात.

(३) स्वमत अभिव्यक्ती : (४)

लेखकाने दुखऱ्या दाताची तुलना अक्राळविक्राळ राक्षसाशी केलेली आहे, याबाबत तुमचे मत लिहा.

**किंवा**

दातदुखीच्या कथा-व्यथा तुमच्या शब्दांत लिहा.



https://www.maharashtrastudy.com

(इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : (४)

(१) खालील चौकटी पूर्ण करा : (२)

रिमझिम पावसात अडई व वणकी या रानबदकांकडून होणाऱ्या कृती –

(य) [ ]

(र) [ ]

प्रचंड बुंधा असलेल्या मोहाच्या झाडाला पोखरी असतात. रिमझिम पावसात अडई व वणकी ही रानबदकं पोखरीत घरटी करून त्यात अंडी घालतात. मोहरानातून तळ्याकडं उडत जाणाऱ्या योणाऱ्या रानबदकांचं दृश्य मोठं गूढ रम्य वाटतं.

माझं वनविभागात जाणं केवळ अपघात नव्हे. ते माझं भाग्य आहे, वनांच्या सावलीत मी वाढलोय. ग्रंथात आढळून येणार नाही असं ज्ञान मी जंगलातून प्राप्त केलंय. गुरुजनांकडून शिकता येणार नाही ते वृक्ष व दगडांनी पढविलयं. वृक्षांइतका धर्मात्मा कुणी नाही. त्यांच्यापासून मी देवाचं अस्तित्व जाणलयं. झाडं जशी सूर्यप्रकाश व दव शोषून घेतात तसं चांगलं तेवढं घेतलय. पानं गळतात. फुलं कोमेजतात. पण ती पुन्हा विकसित होतात. मितव्ययी म्हणजे काय ते जंगलापासून शिकावं. आभाळाच्या, पर्वताच्या, हिरव्या मैदानाच्या चमकणाऱ्या पाण्याच्या केवळ दर्शनानं कितीतरी स्मृती माझ्यात जागृत होतात. तुम्हाला वाटतं ना आपली मुलं विचारी बनावीत, त्यांनी भावनांतील पावित्र्य जाणावं, तर त्यांना जंगलात व पर्वतावर न्या.

(२) कारणे लिहा. (२)

आपल्या मुलांना जंगलात व पर्वतावर न्यावे, कारण –

(य) ......................

(र) ......................



https://www.maharashtrastudy.com

## विभाग २ - पद्य


**कृती २. (अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** (८)

(१) कारणे लिहा – (२)

(य) समुद्र अस्वस्थ होतो, कारण ...............

(र) समुद्र शिणून जातो, कारण ..................

(२) चौकटी पूर्ण करा – (२)




समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड.
तो संत्रस्त वाटतो संध्याकाळी : पिंजारलेली दाढी, झिंज्या.
हताशपणे पाहत असतो समोरच्या
        बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाकडे,
ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय
आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
समुद्राच्या डोळ्यांत थकव्याचं आभाळ उतरत येतं
आणि शिणून तो वळवतो डोके.
इमारतींच्या पलीकडच्या रस्त्यावर थकलेल्या
        माणसांचे पाय, बसचीं चाकं.
समुद्र अस्वस्थ होऊन जातो
शहराच्या आयुष्याच्या विचाराने.
तेव्हा तो मनांतल्या मनांतच मुक्त होऊन फिरूं लागतो
शहरांतल्या रस्त्यांवरून, वस्त्यांमधून.
उशिरापर्यंत रात्रीं तो बसलेला असतो
स्टेशनवरल्या बाकावर एकाकी, समोरच्या
                रुळांवरील रहदारी पाहत,



https://www.maharashtrastudy.com

हातांवर डोकं ठेवून अर्धमिटल्या डोळ्यांनी.
त्याला आठवतं त्याच्याच शेजारीं
पाय मुडपून कसंबसं झोपलेलं एखादं मूल,
ज्याचं बालपण स्टेशनवरल्या बाकाएवढं,
आणि त्याची त्याला कल्पना असावी किंवा नसावी.
समुद्र खिन्न हसतो आणि शिणलेल्या
पापण्या मिटून घेतो.
त्याला काळजी वाटते साऱ्यांच्याच बालपणाची
वयस्कांच्या शहरांतील.

(३) अभिव्यक्ती : (४)

शहरांतील बाल्यावस्थेच्या जीवनाचे वर्णन तुमच्या शब्दात ते स्पष्ट करा.

**(आ)** खालील ओळींचा अर्थ लिहा : (४)

आरशात भेटलीस तरी बोलत नाहीस
ग मन उलगडून
ओठ मात्र असतात पिळवटलेले, खसकन
देह तोडलेल्या फुलांसारखे,
इतकी कशी वेढून गेलीस या घनगर्द संसारात
जळतेस मात्र अहोरात्र पारंपरिकतेचे
वरदान समजून

**(इ)** खालीलपैकी कोणतीही <u>एक</u> कृती सोडवा : (४)

काव्य सौंदर्य :

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!
कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!

वरील ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

**किंवा**


https://www.maharashtrastudy.com

रसग्रहण :

सरी- वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते.
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

वरील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.

## विभाग ३ - साहित्यप्रकार : कथा [१०]

**कृती ३. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** (४)

(अ) (१) एका वाक्यात उत्तरे लिहा : (२)

(य) प्रारंभी कथा कोणत्या हेतूने लिहिली गेली ते लिहा.

(र) कथेची व्याख्या लिहा.

प्रारंभी एखादी शिकवण देण्यासाठी, बोध देण्यासाठी कथालेखन केले गेले. नंतर-नंतर मनोरंजन करण्यासाठी किंवा एखादा विचार, भावना, चित्ताकर्षक घटना वाचकांपर्यंत पोहचवण्यासाठी कथा लिहिल्या जाऊ लागल्या. कथेत घटना असतात, कथानक असते, तिच्यात पात्रे असतात. स्थळ, काळ, वेळ यांचाही उल्लेख कथेत असतो. कथेच्या विषयानुसार तिच्यात विशिष्ट वातावरणही असते आणि समर्पक अशी निवेदनशैलीही असते. कथेतील पात्रांच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष, गुंतागुंतही कथेत असते आणि या सर्वांचा एक उत्कर्षबिंदूही (क्लायमॅक्स) असतो कथेत! अर्थात या सर्व घटकांनी युक्त अशा कथेला समर्पक शेवटही असतो तसेच एक सुयोग्य आणि उत्तम शीर्षक ही असते.

https://www.maharashtrastudy.com

'एक विशिष्ट स्थलकाली पात्रांच्या परस्परसंबंधातून घडलेल्या घटनांचे एखाद्या विशिष्ट हेतूने केलेले उत्कंठावर्धक चित्रण म्हणजे कथा.'

अर्थात प्रत्येक कथेत हे सर्वच घटक असतीलच आणि त्यांचे प्रमाणही सारखे असेल असे म्हणता येणार नाही. एखाद्या कथेत पात्रांना प्राधान्य असेल तर एखाद्या कथेत प्रसंगांना. कधी लेखकाचा दृष्टिकोन अधिक महत्त्वाचा असू शकतो तर एखादी कथा वातावरणनिर्मितीचा हेतू लक्षात घेऊन लिहिली जाऊ शकते. तीच गोष्ट विचारांची आणि भावनांचीही असू शकते.

(२). कथा लेखनासाठीचे आवश्यक असणारे चार मुद्दे लिहा. (२)

**(आ)** खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (६)

(य) 'शोध' कथेतील 'टॅक्सी ड्रायव्हर' या पात्रा विषयीचे तुमचे मत लिहा.

(र) घर सोडण्यामागचा अनुचा विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(ल) गावाच्या विकास कार्यात अडचणी निर्माण करणाऱ्या लोकांबद्दल तुमचे मत लिहा. https://www.maharashtrastudy.com

(व) बापू गुरुजींसारख्या समाजसेवकांसारखे तुम्ही अनुभवलेल्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण लिहा.

## विभाग ४ - उपयोजित मराठी [१४]

**कृती ४. (अ)** खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (४)

(१) मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी तुमच्या शब्दात लिहा.

(२) माहितीपत्रकाची उपयुक्तता स्पष्ट करा.

(३) अहवाल लेखन करताना लक्षात घ्यावयाच्या चार बाबी विशद करा.

(४) बातमी आणि वृत्तलेख यांतील फरक थोडक्यात लिहा.



https://www.maharashtrastudy.com

(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (१०)

(१) माहितीपत्रकाच्या रचनेची वैशिष्ट्ये लिहा :

सुसंगत व अचूक माहिती ............ उपयुक्तता व परिणामकारक दक्षता ............ माहितीपत्रकाची विशेष काळजी व वेगळेपण ............ आकर्षक मांडणी व भाषाशैली ........... मनाला भिडणारी शब्दयोजना.

(२) अहवालाचे स्वरूप व आवश्यकता स्पष्ट करा :

हेतू, तारीख वेळ, समारोप विविध मुद्दे ........... आरंभ ते शेवट ........... क्रमाक्रमाने तपशील ............ माहिती संकलन .......... अहवाल लेखनाची आवश्यकता.

(३) एखादया व्यक्तीची मुलाखत कशी घ्यावी, हे खालील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करा :

मुलाखतीचा प्रारंभ ........... मुलाखतदात्याचे कार्य ............ मुलाखतीचा मध्य ............ प्रश्नांची लवचीकता ............. मुलाखत समारोप.

(४) वृत्तलेखांचे प्रकार खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा :

बातमीवर आधारित वृत्तलेख ............ व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेख .............. मुलाखतीवर आधारित वृत्तलेख............ ऐतिहासिक स्थळ ............ गूढ, विस्मय, नवल यांवर आधारित वृत्तलेख.

## विभाग ५ - व्याकरण व लेखन [२०]

कृती ५. (अ) सूचनेनुसार कृती करा : (१०)

(१) (य) योग्य पर्याय निवडा : (१)

निशिगंधासारखा निशिगंधच होय.

वरील विधानाचे उद्‌गारार्थी वाक्य ओळखून लिहा :

(१) निशिगंध हा निशिगंधच असेल!

(२) निशिगंध म्हणजे निशिगंधच!

(३) निशिगंधासारखा निशिगंधच कसा!

(४) निशिगंध म्हणजे गंध!



https://www.maharashtrastudy.com

(२) सूचनेप्रमाणे सोडवा : (१)

पुढील सगळे मार्ग बंदच होते.

(नकारार्थी वाक्य करा.)

(२) (य) योग्य पर्याय निवडा : (१)

'पतिपत्नी' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.

(१) कर्मधारय समास

(२) द्‌वंद्‌व समास

(३) अव्ययीभाव समास

(४) तत्पुरुष समास

(र) 'पावलोपावली' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा. (१)

(३) (य) योग्य पर्याय निवडा : (१)

'मी हलकेच उठतो' या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा :

(१) कर्तरी प्रयोग

(२) कर्मणी प्रयोग

(३) भावे प्रयोग

(४) यांपैकी नाही

(र) 'भावे प्रयोग' असलेले वाक्य शोधून लिहा : (१)

(१) त्यांना आपण जपलं पाहिजे.

(२) मी डायनिंग टेबल जवळ येतो.

(३) हा संदेश मला पोहोचवता आला.

(४) तुम्ही गाडीतच बसा.

(४) (य) मुंगी उडाली आकाशी (१)

तिने गिळिले सूर्यासी!

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

(१) अर्थान्तरन्यास

(२) अनन्वय

(३) अतिशयोक्ती

(४) अपन्हुती



https://www.maharashtrastudy.com

(र) चौकट पूर्ण करा : (१)

'आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी :

या वाक्यातील उपमान ओळखा. [ ]

(५) (य) 'फितूर होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा : (१)

(१) दगाबाजी करणे.

(२) बोलणी करणे.

(३) शरण जाणे.

(४) अपमान स्वीकारणे

(र) 'फितूर होणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. (१)

**(आ)** खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा : (१०)

(१) निसर्ग माझा सखा

(२) माझा आवडता लेखक / कवी

(३) मी समुद्र बोलतोय

(४) क्रीडांगण बोलू लागले तर .....

(५) वृत्तपत्रांचे महत्त्व

◆◆◆

**https://www.maharashtrastudy.com**
**Whatsapp @ 9300930012**
**Send your old paper & get 10/-**
**अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,**
**Paytm or Google Pay से**



https://www.maharashtrastudy.com